| MHPU240004792025 | रामदास कोंडीबा वाळुंज व इतर<br>वि.<br>माणिक गणपत शिंदे व इतर |
|---|---|

## निशाणी क्र.३१ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ व ४ तर्फे यांनी त्यांचेविरुध्द झालेला 'कैफियत नाही' चा आदेश रद्दबातल होवुन मिळणेसाठी केलेला आहे.

२. वादीने निशाणी क्र. ३४ कडे अर्जावर लेखी म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविलेला आहे. त्याचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादीने दाखल केलेल्या अर्जातील नमुद कारण हे संयुक्तिक नाही. कोणताही पुरावा अर्जासोबत दाखल केलेला नाही. त्यामुळे त्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

३. उभय पक्षकारातर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

४. उभय पक्षकारातर्फे केलेल्या युक्तीवादाचा अभिलेखाशी विचार करता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना कैफियत देण्यासाठी त्यांना संधी देवुनही त्याने कैफियत दाखल केलेली नव्हती. म्हणून त्यांचेविरुध्द ०९/०२/२०२६ रोजी 'कैफियत नाही', असा आदेश झालेला आहे. त्यांच्या कैफियतीचे अवलोकन केले असता कैफियत देत आहेत. प्रस्तुतचा अर्ज दिनांक ११/०६/२०२६ रोजी म्हणजेच चार महिन्यानंतर दिलेला आहे. अर्जात दिलेले कारण जरी ग्राहय धरले तरी समाधानकारक वाटत नाही.

परंतु, न्यायाच्या दृष्टीने व दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी त्याची कैफियत अभिलेखावर घेणे उचित होते. त्यांनी केलेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर रक्कम रु. ५००/– कॉस्ट बसवणे उचित होते.

५. या सर्व बाबींचा विचार करुन खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो –

> अर्ज, रक्कम रुपये ५००/– कॉस्टस वादीला अदा करण्याच्या अटींवर मंजुर करण्यात येतो.

Digitally signed by PATIL AVINASH MADHUKAR
Date: 2026.07.09 15:00:22 +0530

[अविनाश म. पाटील]

दिनांक : ०९/०७/२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, घोडेगाव,
ता. आंबेगाव, जि. पुणे.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word for word as per original order.

| | |
|---|---|
| Name of Steno | : Pravin B. Jadhav. |
| Name of Court | : Shri. Avinash M. Patil.<br>Civil Judge Junior Division,<br>Ghodegaon. |
| Dictated and typed on | : 09.07.2026. |
| Corrected on | : 09.07.2026. |
| Signed on | : 09.07.2026. |